## थोडक्यात

### अमेरिकन टेनिसमधून नदालची माघार

**वॉशिंग्टन** – गतविजेता राफेल नदाल याने कोरोना संसर्गाच्या धोक्यामुळे अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. नदालने 'ट्वीट' करत याबाबतची माहिती दिली आहे. 'जगभरातील परिस्थिती अधिकच किचकट आणि गुंतागुंतीची बनत चालली आहे. अमेरिकन स्पर्धेतून माघारीचा निर्णय घेण्याची माझी इच्छा नव्हती. पण सद्यस्थितीत प्रवास करणे शक्य होणार नाही. त्यामुळे अखेर माघार घ्यावी लागत आहे,' असे नदालने म्हटले आहे. स्पर्धेच्या संचालिका स्टॅसी ॲलस्टर यांनी नदालच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### अमेरिकन टेनिसमध्ये सुमित नागलला प्रवेश

**न्यूयॉर्क** – प्रमुख खेळाडूंनी करोनामुळे माघार घेतल्याने भारताचा युवा टेनिसपटू सुमित नागल याला अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेसाठी थेट प्रवेश देण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या दुसऱ्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत खेळण्यासाठी नागल सज्ज झाला आहे. जागतिक क्रमवारीत १२७व्या स्थानी असलेला नागल हा मुख्य फेरीसाठी प्रवेश मिळालेला टेनिसपटू ठरला आहे.

### प्रो कबड्डीचे प्रक्षेपण हक्क लिलावाद्वारे?

**नवी दिल्ली** – देशातील दुसऱ्या क्रमांकाची लोकप्रिय लीग असा दर्जा प्राप्त करणाऱ्या प्रो कबड्डी लीगच्या आगामी हंगामाचे प्रक्षेपणाचे हक्क लिलाव प्रक्रियेद्वारे ठरण्याची दाट शक्यता आहे. सध्याचे प्रक्षेपणकर्ते स्टार इंडिया यांच्या महसूल वाटपाच्या प्रस्तावामुळे संघ आणि संयोजक मशाल स्पोर्ट्स पेचात सापडले आहेत. स्टार इंडियाने यापेक्षा उत्तम प्रस्ताव ठेवला नाही, तर प्रक्षेपणाचे हक्क पारदर्शक लिलाव पद्धतीने निश्चित व्हावे, यासाठी सर्व संघमालकांनी एकत्रित येऊन मोर्चेबांधणी केली आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. आयपीएलप्रमाणे प्रो कबड्डी लीगचा लिलाव व्हावा. ते स्टार इंडियाला थेट देऊ नये, अशी मागणी संघांनी केली आहे.

# आयपीएल स्पॉन्सरशिप व्हिवो आऊट जिओ इन?

**ॲमेझॉन आणि बायजू या कंपन्याही या शर्यतीत आघाडीवर**

वृत्तसंस्था

नवी दिल्ली, दि. ६ – यूएईमध्ये रंगणाऱ्या आयपीएलच्या तेराव्या हंगासाठी बीसीसीआयने व्हिवो या चिनी मोबाईल कंपनीसोबतचा करार अखेर अधिकृतरित्या मोडला आहे. दरम्यान आता नवीन स्पॉन्सररचा शोधही बीसीसीआयने घेण्यास सुरुवात केली असून जिओ कंपनिचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.

भारत-चीन सीमेवरील वाढत्या तणावामुळे देशात चिनी वस्तूंवर बहिष्काराची मागणी जोर धरत आहे. अशात इंडियन प्रीमिअर लीगनं ( आयपीएल २०२०) टायटल स्पॉन्सर म्हणून व्हिवो कायम राहणार असल्याची घोषणा केल्याने भारतीय क्रिकेट नियामक मंडळावर (बीसीसीआय) टीका झाली. त्यानंतर बीसीसीआयने स्वतः माघार घेताना यंदाच्या आयपीएलमध्ये व्हिवो आयपीएलच्या टायटल स्पॉन्सरवरून माघार घेतली. त्यामुळे नवा टायटल स्पॉन्सर मिळवण्यासाठी बीसीसीआयची धडपड सुरू झाली आहे. यात जिओ हे नाव आघाडीवर असले तरी त्यांना ॲमेझॉन आणि बायजू या दोघांकडून टक्कर मिळू शकते. व्हिवोने २१९९ कोटींत आयपीएलचे टायटल स्पॉन्सर हक्क मिळवले होते. त्यानुसात आयपीएलला एका वर्षाला व्हिवोकडून ४४० कोटी मिळतात. यापूर्वी पेप्सिको ही आयपीएलची टायटल स्पॉन्सर होते आणि त्यांनी २०१६ मध्ये ३९६ कोटी रुपये दिले होते.

व्हिवोचा तीन वर्षांचा करार अजूनही शिल्लक आहे. त्यानुसार २०२१, २०२२ ला व्हिवोपुन्हा आयपीएलचे टायटल स्पॉन्सर म्हणून परतणार आहेत. पण, यंदाच्या आयपीएलच्या टायटल स्पॉन्सरसाठी जिओ, ॲमेझॉन आणि बायजू यांची नावं पुढे येत आहेत. यापैकी मुकेश अंबानी यांच्या जिओने आघाडी घेतल्याची चर्चा सुरू आहे. सूत्रांच्यामहितीनुसार बीसीसीआय आणि जिओ यांच्यात प्राथमिक चर्चा झाली आहे, परंतु अजूनही अंतिम निर्णय झालेला नाही. दरम्यान ॲमेझॉन आणि बायजू यांच्या नावांचीही चर्चा आहे. विशष म्हणजे बायजूनं टीम इंडियाच्या जर्सी स्पॉन्सरचे हक्क मिळवले आहेत. शिवाय कोलकाता नाईट रायडर्सचे ते मुख्य स्पॉन्सर आहेत. बायजूचा सहमालक शाहरुख खान हा बायजूचा ब्रँड ॲम्बेसीडर आहे.

सूत्रांच्या महितीनुसार व्हिवोकडून दिली जाणारी ४४० कोटी इतकी रक्कम देण्यास कुणी तयार नाही. त्यामुळे त्यांना डिस्काऊंट हवं असल्याचे बालले जात असून आता बीसीसीआय काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## व्हिवोचा करार स्थगित; बीसीसीआयची अधिकृत घोषणा

आयपीएलच्या टायटल स्पॉन्सरशिपचा करार स्थगित करण्यात आल्याची माहिती आयपीएल गव्हर्निंग काऊन्सिलने परिपत्रक जाहीर करत दिली आहे. २०१८ साली बीसीसीआय आणि व्हिवो कंपनीचा ५ वर्षांचा करार झाला होता. आयपीएल स्पर्धेच्या स्पॉन्सरशिपसाठी व्हिवोने बीसीसीआयला २१९९ कोटी रुपये दिले होते. प्रत्येक हंगामाला व्हिवो कंपनी बीसीसीआयला ४४० कोटी रुपये देत होती. गव्हर्निंग काऊन्सीलच्या बैठकीनंतर व्हिवोच्या अधिकाऱ्यांशी वेगळी चर्चा केली. या चर्चेअंती एक वर्षासाठी व्हिवो आयपीएलला स्पॉन्सर करणार नाही हे ठरवण्यात आलंय. दोन्ही बाजूंनी सामोपचाराने यावर निर्णय घेण्याचं ठरवलं आहे. या वर्षाच्या मोबदल्यात कंपनीसोबतचा करार २०२३ पर्यंत वाढवता येईल का याची चाचपणी बीसीसीआय करणार असल्याची माहिती बीसीसीआयमधील सूत्रांनी दिली आहे.

## पाकिस्तानच्या क्रिकेटपटूकडून राम मंदिराच्या भूमिपूजनाची स्तुती

वृत्तसंस्था



कराची, दि. ६ – बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचा भूमिपूजन सोहळा पार पडला. या सोहळ्यावर जगभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. विशेष करुन क्रीडा विश्वातील अनेक दिग्गजांनी या सोहळ्याचे कौतुक केले. यामध्ये पाकिस्तानचा क्रिकेटपटू दानिश कनेरिया याचाही समावेश आहे.

आज जगभरातील हिंदूंसाठी हा ऐतिहासिक दिवस आहे. प्रभू श्रीराम हे आमचे आदर्श आहेत. आम्ही सुरक्षित आहोत आणि आमच्या धर्मावरील विश्वासामुळे कोणाला कोणतीही समस्या उद्भवू नये. प्रभू श्रीराम यांचं जीवन आम्हाला एकता आणि बंधुभावाची शिकवण देतं. जय श्रीराम!, असे दानिश म्हणाला. मात्र त्यानंतर काही इस्लामिक संघटनांनी धमक्या दिल्याने त्याने ट्विटरवरून आपली प्रतिक्रिया डिलिट केल्याचे समजते.

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात दानिश कनेरिया चर्चेत आला होता. पाकिस्तानचा माजी जलदगती गोलंदाज शोएब अख्तरनं केलेल्या एका वक्तव्यामुळे त्याच्या नावाची चर्चा झाली होती. दानिश कनेरिया हिंदू असल्यामुळे संघातील काही सदस्य त्याच्यासोबत जेवण्यासही विचार करत असते, असे तो म्हणाला होता. परंतु त्यानंतर त्याने आपले वक्तव्य चुकीच्या पद्धतीने प्रसिद्धि माध्यमांसमोर आल्याचेही त्याने म्हटले होते. दरम्यान आता पुढील तीन वर्षांमध्ये राम मंदिर बांधून पूर्ण होणार आहे. सर्वांसाठी हा आनंदाचा क्षण असल्याचे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले होते.

## ....आणि आयुष्याला एकदम कलाटणी मिळाली – इशांत शर्मा

वृत्तसंस्था

नवी दिल्ली, दि. ६ – भारतीय कसोटी क्रिकेट संघातील प्रमुख गोलंदाज इशांत शर्मा गेले काही वर्ष भारतीय वन-डे संघात आपलं स्थान मिळवण्यचा प्रयत्न करीत आहे, मात्र ते शक्य झालेले नाही. इशांत शर्मा याने एका क्रीडा संकेतस्थळाला मुलाखत देताना त्याच्या करिअरला कलाटणी देणाऱ्या सामन्याची माहिती दिली आहे.



२०१३ साली ऑस्ट्रेलियाच्या भारत दौऱ्यादरम्यान जेम्स फॉकनरने मोहाली वन-डे सामन्यात एका षटकात ३० धावा चोपल्या. तो सामना आयुष्याला कलाटणी देणारा प्रसंग ठरल्याचे इशांतने सांगितले.

२०१३ साली मोहाली वन-डे सामन्यात फॉकनरने माझ्या एका षटकात ३० धावा चोपल्या आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाने तो सामनाही जिंकला. त्या क्षणी मी माझ्या देशाला फसवतोय असं वाटत होतं. पुढील २-३ आठवडे मी कोणाशीही बोलत नव्हतो. मी प्रचंड रडलो. तसा मी खूप खंबीर असतो. माझी आई मला नेहमी म्हणते की तुझ्यासारखा खंबीर मुलगा मी कुठे पाहिला नाही. पण त्यावेळी मी माझ्या गर्लफ्रेंडला फोन केला आणि एखाद्या लहान मुलासारखा रडलो. ते दोन-तीन आठवडे माझ्यासाठी खूप भयानक होते. मी धड जेवत नव्हतो, मला झोप लागत नव्हती. टीव्ही लावला तर सातत्याने तुमच्या कामगिरीवर टीका होतानाच्या बातम्या दिसायच्या, ज्यामुळे अधिक निराशा यायची.'' इशांत आपल्या खडतर काळाबद्दल बोलत होता. पण यानंतर माझ्यात खूप बदल झाला. मी प्रत्येक गोष्टीकडे गांभीर्याने पहायला शिकलो. याआधी माझ्याकडून एखाद्या सामन्यात खराब कामगिरी झाली आणि त्याबद्दल मला कोणी सांगायला आलं तर मी त्यांना, ठीक आहेअसं होतं कधीतरी ! असं म्हणायचो. मात्र फॉकनरच्या प्रसंगानंतर माझ्यात बदल घडवायचा ठरवलं. माझ्याकडून झालेल्या प्रत्येक चुकीची जबाबदारी मी घ्यायचं ठरवलं आणि स्वतःची कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर माझ्या कामगिरीत बदल घडल्याचं इशांतने सांगितले.

## यूएईत जाण्याआधी आणि गेल्यावर खेळाडू आणि संघांची सत्वपरीक्षा

**बीसीसीआयकडून आयपीएलच्या संघांसाठी कार्यपद्धती जाहीर**

वृत्तसंस्था

नवी दिल्ली, दि. ६ – बीसीसीआयने केलेल्या अथक प्रयत्नानंतर आयपीएलचा मार्ग माकळा झाला आहे. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीमुळे आयपीएलमध्ये सहभागी खेळाडू आणि संघ यांना मात्र अजून काही दिव्य परिक्षांना सामोरे जावे लागणार आहे. संयुक्त अरब अमिरातीकडे प्रस्थान करण्यापूर्वी दोन नकारात्मक कोव्हिड चाचण्या आणि जैव-सुरक्षा नियमाचा भंग केल्यास शिक्षा अशा मुद्यांचा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बुधवारी संघांकडे सुपूर्द केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीत समावेश आहे.

'आयपीएल' पदाधिकारी आणि संघमालक यांच्यात बुधवारी झालेल्या बैठकीत विलगीकरणासह काही मुद्यांवर गांभीर्याने चर्चा झाली. या चर्चेदरम्यान आयपीएलमध्ये सहभागी खेळाडू आणि संघ यांच्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार स्पर्धा सुरू झाल्यानंतर प्रत्येक पाचव्या दिवशी खळाडूंना कोरोना चाचणी द्यावी लागणार आहे. खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला फ्रेंचाईजींशी जुळण्याच्या एक आठवड्याआधी २४ तासात दोनदा कोरोना चाचणी द्यावी लागेल. यानंतर खेळाडू भारतातच विलगीकरणात राहतील. चाचणीत एखाद्याचा अहवाल पॉझिटिव्ह आला तरी ती व्यक्ती १४ दिवस विलगीकरणातच राहणार आहे. १९ सप्टेंबरला सुरू होणाऱ्या आयपीएलसाठी यूएईकडे रवाना होण्यासाठी विलगीकरण कालावधी संपताच २४ तासात आरटी-पीसीआर चाचणीचा अहवाल निगेटिव्ह असणे आवश्यक राहणार आहे. यूएईत दाखल होताच खेळाडू आणि स्टाफसाठी एक आठवड्याचे विलगीकरण असेल. यादरम्यान तीनवेळा कोरोना चाचणी होईल. या चाचण्या निगेटिव्ह आल्यानंतर जैवसुरक्षा वातावरणात प्रवेश मिळेल आणि सरावाची परवानगी असेल, असे सांगण्यात आले आहे. यातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे यूएईत पहिल्या आठवड्यात खेळाडू आणि अधिकाऱ्यांना हॉटेलमध्ये एकमेकांशी भेटता येणार नाही. जे खेळाडू थेट यूएईत दाखल होतील त्यांचे काय, या प्रश्नाचे उत्तर देताना अधिकऱ्यांनी सांगितले की, 'सर्व विदेशी खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला विमान प्रवासाआधी कोरोना चाचणीचा निगेटिव्ह अहवाल सादर करावा लागेल.

## ब्रायन लाराला कोरोना; ही केवळ अफवाच

वृत्तसंस्था

नवी दिल्ली, दि. ६ – वेस्ट इंडिजचा दिग्गज क्रिकेटपटू ब्रायन लारा याला कोरोना झाल्याची चर्चा काल बुधवारी दिवसभर सोशल मीडियावर रंगली होती. त्यावर ब्रायन लारा याने गुरुवारी अखेर मौन सोडलं असून ही केवळ अफवा असल्याचे त्याने स्वतः जाहीर केले आहे.

दरम्यान या अफवेमुळे मागील २४ तासांत लाराच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी नेटिझन्सच्या पोस्टचा पाऊस पडला. कोरोना चाचणी पॉझिटिव्ह आल्याच्या वृत्तावर लारानं स्पष्ट मत मांडले आहे. त्याने अफवा पसरवणाऱ्यांना चांगलेच झापले. त्यानं कोरोना रिपोर्ट निगेटिव्ह आल्याचे सांगितले. त्याने साशल मीडियावर लिहिले की, माझा कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्याच्या अफवा पसरल्या आहेत आणि त्याबाबत मला तुम्हाला महत्त्वाचे सांगायचे आहे. हे वृत्त खोटं आहे आणि त्यामुळे आधीच कोरोना व्हायरसमुळे तणावात असलेल्या लोकांमध्ये अशा अफवेने घबराट पसरत आहे.

२००७ मध्ये लाराने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर २२,३५८ धावा आणि ५३ शतकं आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वोत्तम वैयक्तिक खेळीचा विक्रम ५१वर्षीय लाराच्या नावावर आहे. त्यानं २००४मध्ये इंग्लंडविरुद्ध ४०० धावा चोपल्या होत्या. त्याशिवाय प्रथम श्रेणी क्रिकेटमध्येही नाबाद ५०१ धावांच्या सर्वोत्तम वैयक्तिक खेळीचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. त्यानं वॉर्विकशायर क्लबचे प्रतिनिधित्व करताना १९९४साली डरहॅमक्लबविरुद्ध ही खेळी केली होती. शिवाय कसोटीत एका षटकात सर्वाधिक धावांचा विक्रमही लारानं केला आहे. त्यानं २००३ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध रॉबीन पीटरसनच्या एका षटकात २८ धावा चोपल्या होत्या.

## पावसामुळे डी. वाय. पाटील स्टेडियमचे अतोनात नुकसान



नवी मुंबई, दि. ६ (वार्ताहर) – वादळी वाऱ्यासह मंगळवार रात्री पासून कोसळणाऱ्या पावसामुळे नवी मुंबई शहरात ठिकठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या आहेत. यात नेरुळ मधील डॉ.डी.वाय.पाटील स्टेडीयमवरील छप्पर कोसळल्याने स्टेडियमचे मोठा प्रमाणात नुकसान झाले आहे.

**स्वारस्याच्या अभिव्यक्ती (ईओआय) साठी निमंत्रण**

**राखीव किंमत रु. ९८.९६ कोटींना**

**मंद विक्री करिता अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. समापनातील (कॉर्पोरेट कर्जदार) च्या नागपूर, महाराष्ट्र येथील ४ x ६१.५ एमडब्ल्यु पॉवर प्लॉट च्या विक्रीसाठी**

**ईओआय सादर करण्याची अंतिम तारीख : १२ ऑगस्ट, २०२०**

(रु. २५,०००/- च्या विना-परतावा शुल्कासह ईओआय सादर करावी) तपशिलांसाठी **http://vinodkothari.com/bankruptcy-code/amnep/** येथे भेट द्यावी. किंवा **amneplliquidation@gmail.com** येथे एक मेल टाकावा.

विनोद कुमार कोठारी, परिसमापक
अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. समापनातील
पत्ता : १००६-१००९, किष्णा बिल्डिंग, २२४ ए जेसी बोस रोड, कोलकात्ता - ७०००१७
ई-मेल : **resolution@vinodkothari.com**
नोंदणी क्र. : आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन०००१९/२०१६-१७/१००३३
**दिनांक : ४ ऑगस्ट, २०२०**

## गुजरातहून आलेला ६५ लाखांचा गुटखा भिवंडीत जप्त

वार्ताहर

भिवंडी, दि. ६ – महाराष्ट्रात सुगंधी तंबाखू व गुटखा विक्रीस प्रतिबंध असतानाही शेजारील गुजरात राज्यातून विविध मार्गे कोट्यवधी रुपयांचा गुटखा, पान मसाला महाराष्ट्रात विक्री केला जात असून ठाणे येथील अन्न सुरक्षा पथकाने भिवंडी तालुक्यातील खारबाव येथे रात्रभर पाळत ठेवून तीन ट्रक मधून भिवंडीच्या दिशेने येणाऱ्या तीन ट्रक मधील २८० गोण्यांत असलेला ६५ लाख ७८ हजार रुपये किमतीचा विमल सुगंधित पान मसाला व गुटखा व ३६ लाख रुपयांचे तीन ट्रक ताब्यात घेत कारवाई केली आहे.



ठाणे अन्न सुरक्षा विभागाचे सहाय्यक आयुक्त भूषण मोरे यांना गुप्त बातमीदारामार्फत भिवंडी शहराच्या दिशेने गुजरात येथून तीन ट्रक मधून गुटखा व सुगंधित तंबाखू येत असल्याची माहिती समजली असता अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त अरुण उन्हाळे व कोकण विभागासह आयुक्त शिवाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा निरीक्षक माणिक जाधव, एस एम वधारकर, एम एम सानप, ए डी खडके या पथकाने खारबाव येथे एक धाब्यावर रात्रभर पाळत ठेवून पहाटेच्या सुमारास पंधरा पंधरा मिनिटांच्या अंतराने आलेल्या तीन ट्रकांची तपासणी केली असता त्यामध्ये २८० गोणी विमल सुगंधित पान मसाला व तंबाखू गुटखा आढळून आला. या कारवाईत ट्रक चालक मोहम्मद आदिल व उदल यादव यांना ताब्यात घेत असतानाच तिसरा ट्रक चालक अंधाराचा फायदा घेत एक पसार झाला असून ६५ लाख ७८हजार रुपयांचा गुटखा व ३६ लाख रुपयांचे ट्रक असा एकूण १ कोटी १ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करीत सर्व मुद्देमाल जप्त केला आहे.

## रायगड जिल्ह्यात कोरोनामुक्तीमध्ये वाढ

प्रतिनिधी

पनवेल, दि. ६ – रायगड जिल्ह्यात कोरोना मुक्त होण्याच प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. बुधवारी १८ रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे तर ४२६ नव्या पॉझिटिव्ह रुग्णांची भर पडली. मात्र सुखावणारी गोष्ट म्हणजे ३९८ रुग्ण बरे झाले आहेत.

दरम्यान मृत्यू झालेल्या रुग्णांमध्ये पेण चार, पनवेल तीन, उरण तीन, अलिबाग दोन, मुरुड दोन, तसेच खालापूर, रोहा, श्रीवर्धन, पोलादपूर येथे प्रत्येकी एकाचा समावेश आहे. तर आढळलेल्या रुग्णांत पनवेल मनपा १७७, पनवेल ग्रामीण ४४, पेण ७६, रोहा ३८, अलिबाग २८, खालापूर २३, उरण १०, माणगाव १०, कर्जत नऊ, सुधागड तीन, महाड तीन, मुरुड दोन, तळा दोन तर पोलादपूर तालक्यातील एका रुग्णाचा समावेश आहे. पनवेल तालुक्यात बुधवारी कोरोनाचे २२१ नवीन रुग्ण आढळले असून तीन जणांचा मृत्यू झाला आहे तर २०८ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. पनवेल महापालिका हद्दीत दिवसभरात १७७ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली असून तीन जणांचा मृत्यू झाला आहे तर १७८ रूग्ण बरे झाल्याने त्यांना रूग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. पनवेल ग्रामीणमध्ये ४४ नवीन कोरोनाबाधित रूग्णांची नोंद झाली असून ३० रुग्णांनी कोरोनावर मात केल्याने त्यांना घरी पाठवण्यात आले आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात तीन व्यक्तींचा मृत्यू झाला.

## पावसाने केली भिवंडी पालिकेच्या कामांची पोलखोल

वार्ताहर

भिवंडी, दि. ६ – बुधवारी रात्रीपासून भिवंडी शहर व ग्रामीण भागात पावसाने जोरदार हजेरी लावली होती. मुसळधार पावसाने शहरातील सखल भागात पाणी तुंबल्याने मनपाने केलेला नालेसफाईचा दावा फोल ठरला आहे. त्याचबरोबर पावसाळ्याची पूर्व तयारी म्हणून लॉकडाऊन आधी फेब्रुवारी महिन्यात शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची मनपा प्रशासनाकडून दुरुस्ती करण्यात आली होती. मनपाच्या वतीने शहरातील खड्डेमय रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले. यासाठी मनपाप्रशासनाने कोट्यावधींचा खर्च देखील केला आहे. मात्र मुसळधार पावसात निकृष्ठ दर्जाचे डांबरी रस्ते बुधवारी उखडले व रस्त्यावर भले मोठे भगदाड पडल्याची घटना धामणकर नाका – कामतघर रस्त्यावर घडली आहे. एकंदरीतच पावसाने पालिकेच्या कामांची पालखोल केली आहे.

विशेष म्हणजे फेब्रुवारी महिन्यात या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू असताना हे काम कसे निकृष्ठ आहे याची चित्रफीत एका दक्ष नागरिकाने सोशल मीडियावर प्रसारित केली होती. या व्हायरल व्हिडीओची दखल मनपा प्रशासनाने घेतली मात्र कंत्राटदारावर कोणतीही कारवाई न करता फक्त निकृष्ठ दर्जाचे काम केलेला भाग जेसीबीच्या साहाय्याने काढून टाकण्यात आला होता. मनपाच्या या अजब कारभाराची शहरातून प्रचंड खिल्ली उडवली गेली होती, मात्र मनपाच्या अधिकाऱ्यांवर कोणताही परिमाण झाला नाही. येत्या पावसाळ्यात हा रस्ता अजिबात टिकणार नसल्याचा दावा ॲड भागवत वाघमारे यांनी केला होता, मात्र त्याकडे मनपाने दुर्लक्ष केले. अखेर मनपाचा हा हलगर्जी पणा मुसळधार पावसात जनतेसमोर आला आहे. दुसरीकडे वऱ्हाळदेवी तलावाच्या बाजूला असलेल्या उतारावर भुयारी गटारांवर टाकलेले व रस्त्याचे केलेले डांबरीकरण अक्षरशः ढासळले व त्याठिकाणी मोठे भगदाड पडले आहे. सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र रस्त्याचे अशा प्रकारे निकृष्ठ काम करणाऱ्या ठेकेदारांवर व मनपाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर मनपा आयुक्त काय कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### नैसर्गिक नाले बुजविल्याने गाव-खेड्यातील घरांमध्ये पाणी



भिवंडी तालुक्याच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गोदाम व्यवसाय फोफावला आहे. स्थानिक पुढारी, जमीन मालक व विकासक यांच्याकडून गोदामांचे बांधकाम करताना परिसरातील नैसर्गिक नाले बुजवून त्या नाल्यांवर अनधिकृत बांधकाम करण्यात येत आहे. त्यामुळे तालुक्याच्या गावखेड्यातील घरांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने नाल्यांमधील पाणी वाहून जाण्याचा मार्ग बंद झाल्याने पावसाचे पाणी दापोडा ग्रामपंचायत तसेच सारंग गांव, शेलार, खोणी, माणकोली गावच्या हद्दीतील अनेक बंगले, घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरीकांची एकच त्रेधातिरपीट उडाली त्यामुळे स्थानिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. दापोडा गावाच्या मागील बाजूस असलेल्या गोदामाचे बांधकाम खाडी क्षेत्रात अनधिकृत बांधकामे केले आहे. त्याविरोधात नागरिकांनी महसूल विभागाकडे अनेक तक्रारी केलेल्या आहेत मात्र विकासकांच्या अर्थपूर्ण व्यवहारामुळे कारवाई केली जात नाही असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून परिसरातील खाडीचे परंपरागत नाले सुध्दा माती भराव टाकून बुजवून टाकले आहेत त्यामुळे हे पावसाच्या पुराचे पाणी गावांमध्ये शिरले शिरल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

**पश्चिम रेल्वे**

**एसी वेटिंग रुमचे मेंटेनन्स आणि मॅनिंग**

**ई-निविदा सूचना क्र. आणि तारीख : सीए ११_वेटिंग रुम_२०२० दिनांक ०६.०८.२०२०. काम आणि ठिकाण** : ०५ (पाच) वर्ष कालावधीकरिता मुंबई विभागाच्या मुंबई सेन्ट्रल स्टेशन (एमएमसीटी) येथे पेय/अल्पोपहार वितरित करण्यासाठी युनिट आणि अद्ययावत सोई, सुविधांसह एसी वेटिंग रुमची डेव्हलपमेंट, अपग्रेडेशन, नुतनीकरण, मेंटेनन्स आणि मॅनिंग करिता निविदा. **कामाची अंदाजे किंमत** : ४१,६७,८००/- ५ वर्षाकरिता (कर इ. सह) **इअर रु. : ८३,४००/- पूर्तता कालावधी** : ५ वर्ष, **ऑनलाईन सादरीकरण बंद घेण्याची तारीख आणि वेळ** : ०४.०९.२०२० रोजी दु. ३.०० पर्यंत. **ई-निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ** : ०४.०९.२०२० रोजी दु. ३.३० वा. कृपया निविदा दस्तावेज, शुद्धिपत्र आणि पुढील तपशिल डाऊनलोड करण्यासाठी आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** ला भेट द्यावी. निविदेची किंमत आणि इअर फक्त ऑनलाईन नेट बँकिंग किंवा ई-पेमेंट गेटवे मार्फत स्वीकारण्यात येईल. बोलीदाराने स्वतःला अपटेड ठेवण्यासाठी नियमितपणे वेबसाईटला भेट देणे आवश्यक आहे. 06

Like us on : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**

**स्वारस्याची अभिव्यक्ती निमंत्रणाची सूचना**

सुरत हे गुजरात राज्यातील दुसरे सर्वात मोठे शहर असून भारतातील नववे सर्वात विशाल महानगर क्षेत्रांत येते. जगातील चौथे सर्वात प्रगतीशील शहर आणि भारतातील पहिले 'स्मार्ट आयटी' शहर अशा सारखे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गौरव शहराला प्राप्त झाले आहेत. त्याच्या भक्कम हिरे व टेकस्टाईल इंडस्ट्रीच्या जोरावर सुरत शहर देशाच्या जीडीपीत मोठे योगदान देणाऱ्या पहिल्या दहा पैकी एक शहर आहे. देशाचे 'टेकस्टाईल हब' अशी लोकप्रिय ओळख असणारे हे शहर अदानी हझीरा पोर्ट प्रा. लि., आर्सेलर मित्तल/निप्पॉन स्टील आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लि. अशा सारख्या मोठ्या उद्योगांपासून काही मैल दूर अंतरावर स्थित आहे.

**मुंबई विभाग, प. रेल्वे.**, ह्या औद्योगिक आणि कापड उद्योग केंद्राच्या वाढीस चालना देण्यासाठी संपूर्ण लॉजिस्टिक समाधान देण्यास इच्छुक आहे. ह्या संबंधात विभाग **''एका पीपीपी मॉडेल वर अतिरिक्त फ्रेट/पार्सल हँडलिंग लाईन, कव्हर्ड वेअर हाऊस, ओपन स्टॅकिंग एरिया (कंटेनर्स सह), हँडलिंग सिस्टीम्स चे यांत्रीकीकरण आणि ट्रक पार्किंग टर्मिनल च्या तरतुदींसह मल्टी कार्गो, मल्टी मॉडेल ऑपरेशन साठी एक कॉमन युजर फॅसिलिटी म्हणून उधना फ्रेट हँडलिंग रेल्वे टर्मिनल च्या विकासासाठी''** स्वारस्याची अभिव्यक्ती (ईओआय) प्राप्त करण्यास इच्छुक आहेत.

ह्या ईओआय दस्तावेजाचा उद्देश इच्छुक पक्षकारांना प्रकल्पाविषयी संबंधित माहिती देणे व प्रकल्पाच्या व्याप्ती बद्दल अवगत करणे आणि इच्छुक तसेच पात्र ''एजन्सीज'' कडून प्रतिसाद मागवणे हा आहे. त्यांचे उत्तर आणि सूचना सादर करण्यासाठी ह्या ईओआय दस्तावेजाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला एजन्सीज ना देण्यांत येतो. ह्या ईओआय दस्तावेजाकरिता भाग घेणाऱ्यांकडून प्रतिसादाचा भाग म्हणून प्राप्त होणारे अभिप्राय आणि सूचना, नजिकच्या भविष्यांत प्रकाशित करण्याचे प्रस्तावित असलेल्या प्रकल्पासाठी आरएफपी तयार करण्याकरिता वापरले जातील. हा ईओआय दस्तावेज अहस्तांतरणीय आहे. **ईओआय प्रतिसादासाठी अंतिम तारीख** : उशिरात उशिरा २०.०८.२०२० पर्यंत दु. ३.०० वा पर्यंत. **प्रस्ताव/ईओआय ला प्रतिसाद येथे सादर करावेत** : ए. ई-मेल : **bctsrdcm@gmail.com** बी. प्रतिसादाची हार्ड कॉपी स्पीड पोस्ट मार्फत २०.०८.२०२० रोजी किंवा त्यापूर्वी दु. ३.०० वा. पर्यंत पुढील पत्त्यावर पोहोचेल अशी सादर करावी. सिडीसीएम, तळमजला, डिव्हीजनल रेल्वे मॅनेजरचे कार्यालय, पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४००००८. **ईओआय डाऊनलोड करण्याकरिता वेबसाईट : wr.indianrailways.gov.in** 05

Like us on : facebook.com/WesternRly Follows us on : twitter.com/WesternRly

हे पत्र संचालक इंडियन नॅशनल प्रेस (बॉम्बे) प्रा. लिमिटेड यांच्याकरिता जी. एल्. लखोटिया यांनी जर्नल प्रेस, फ्री प्रेस हाऊस, २१५, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ येथे छापून प्रसिध्द केले. दिल्ली कार्यालय : १/१८ आय्.एन.एस्. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली. ११०००१. कोलकाता कार्यालय : ८, मोइरा, स्ट्रीट, कोलकाता- ७०००१७. RNI No. 1691/57 मुंबई दूरध्वनी क्रमांक संपादकीय २२८५३३३५ (विस्तार -१३३) जाहिरात २२८७४५६६, २२८५३३३५, (विस्तार -१२४ व १२५) २२८५३३४२ AIR SURCHARGE 50 PAISE ONLY. E-Mail : navshakti.news@gmail.com/ mail@fpj.co.in **व्यवस्थापकीय संपादक : गिरधरलाल लखोटिया, संपादकः सुकृत खांडेकर** Reg. No. MCS/049/2018-20